CMYK

परदेशी शिक्षणाचे स्वप्न भारतातच पूर्ण होणार
>> पान 2

विमान अपघातात काय तांत्रिक बिघाड झाला त्याची कारणे समोर आली पाहिजे : आमदार सतेज पाटील
>> पान 3

सतेज पाटलांनी न बोलता मी विजयी होणार असं सांगितलं पाहिजे : मुश्रीफ
>> पान 4


# दैनिक आपला विदर्भ

सुविचार
जीवनात संतुलन राखा

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 274 ■ रविवार, दि. 15 जून 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




सुनिधी चौहाननं स्वरबद्ध केलं बाप-लेक नात्याच्या अंतरंगात डोकावणारं गाणं!
आतील पान

# अखेर एसटीचं विभाजन

## एसटी महामंडाळाची राज्यात ५ प्रादेशिक कार्यालयं सुरू

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिलेल्या निर्देशानंतर सुनियोजन आणि निर्णयाचं विकेंद्रीकरण करण्याच्या हेतूनं कर्नाटक परिवहन महामंडळ धर्तीवर एसटी महामंडळांतर्गत पाच प्रादेशिक विभागांची निर्मिती करण्यात आली आहे. त्याची अंमलबजावणी करण्याचे परिपत्रक नुकतेच एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी काढले असून पुढील काही दिवसात हे प्रादेशिक विभाग स्वतंत्रपणे आपले कार्यालयं सुरू करत आहेत.



महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या म्हणजे एसटी महामंडळाच्या नियोजन व पणन खाते अंतर्गत कार्यरत असलेल्या विविध संनियंत्रण समित्यांचं कार्यालय ६ डिसेंबर २०१६ ला बंद करण्यात आलं होतं. परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक कर्नाटक राज्याच्या दौऱ्यावर असताना त्यांनी तिथल्या महामंडळाच्या विकेंद्रीकरणाची संकल्पना उचलून धरली. त्यामुळं आकार आणि प्रशासकीय दृष्ट्या कर्नाटक महामंडळाच्या दुप्पट असणाऱ्या महाराष्ट्र एसटी महामंडळाचं देखील किमान ५ प्रादेशिक विभागात विभाजन करावं अशी संकल्पना त्यांनी मांडली.

नियंत्रण, नियोजन आणि समन्वयासाठी ५ प्रादेशिक विभागांची रचना : "राज्य शासनाच्या महसूल विभागाच्या धर्तीवर एसटीची यंत्रणा उभी आहे. तालुकास्तरावर आगार जिल्हास्तरावर विभागीय कार्यालय आणि राज्य स्तरावर मध्यवर्ती कार्यालय अशी त्रिस्तरीय रचना सध्या कार्यरत आहे. परंतु राज्य शासनाच्या महसूल

>> पान २

### प्रादेशिक विभागाचे मुख्यालय निश्तिच

या निर्णयानुसार मुंबई, नाशिक, नागपूर, पुणे व अमरावती असे ५ प्रादेशिक विभाग केले आहेत. प्रत्येक प्रादेशिक विभागाअंतर्गत कार्यरत विभाग आणि मुख्यालय निश्चित करण्यात आलेत. प्रत्येक समितीसाठी अधिकाऱ्यांची नेमणूक केली असून त्या-त्या भागातील प्रवाशांना अधिक सुरक्षित, सोयीस्कर आणि वेळेत सेवा मिळण्यासाठी सर्व प्रकारचे नियोजन राबवले जाणार आहे. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना योग्य ती अंमलबजावणी तातडीने सुरु करण्याचे निर्देश दिले आहेत.

# दोन सख्या भावांचा जागेवर जीव गेला



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** मराठवाड्यात आता पावसाचा जोर वाढला असून पेरणीयोग्य पावसामुळे शेतकऱ्यांची लगबग वाढली आहे. जिल्ह्यातील सिल्लोड भागात झालेल्या जोरदार पावसामुळे शनिवारी दुपारी वीज पडून चार जणांचा मृत्यू झाला आहे. यात दोन सख्या भावांचा समावेश आहे. शेतात पेरणी करण्यासाठी शिवारात गेले असता अंगावर वीज कोसळून दोन भावांचा मृत्यू झाला.

सिल्लोड तालुक्यातील सारोळा गै. गावात शेतात पेरणी करत असताना वीज पडून दोन सख्या भावांचा मृत्यू झाला. मृतांची नावे रोहित काकडे (वय २०) आणि यश काकडे (वय १७) अशी आहेत. ही दोघं भाऊ आपल्या आईसोबत शेतात पेरणीच्या कामात व्यस्त होते. अचानक वातावरणात बदल झाला आणि जोरदार विजांचा कडकडाट सुरू झाला. याच वेळी वीज थेट त्यांच्या अंगावर कोसळली, आणि जागीच त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त केली जात आहे. दुसरी घटना मोढा बू. (ता. सिल्लोड) परिसरात घडली. येथे रंजना बापुराव शिंदे (वय ५०) या महिला आपल्या गट क्रमांक २६६ मधील शेतात काम करत असताना अंगावर वीज पडून त्यांचा मृत्यू झाला.तिसरी घटना मौजे पिंपळदरी (ता. सिल्लोड) येथे घडली. येथेही वीज पडून शिवाजी सतीश गव्हाणे या युवकाचा मृत्यू झाला, तर त्याचा भाऊ जीवन सतीश गव्हाणे गंभीर जखमी झाला आहे.

त्याच्यावर तातडीने उपचार

>> पान २

# धर्माच्या नावाने कामावरून काढणे चुकीचे : जितेंद्र आव्हाड





**ठाणे/प्रतिनिधी :** शनिशिंगणापूरला जे काय झाले ते पुरोगामी महाराष्ट्राला मान खाली घालणारे आहे. हा अन्याय आहे.धर्माच्या नावाने कामावरून काढणे चुकीचे असे मत आमदार जितेंद्र आव्हाड यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले. हे प्रकार थांबवले पाहिजे, हा रोग आहे महाराष्ट्राला हा रोग लागला आहे.महाराष्ट्राने कमवलेली इज्जत धुळीला मिळेल, मातीत जाईल. मुख्यमंत्र्यांना हात जोडून विनंती आहे हे थांबवा. याचे रिएक्शन पूर्ण महाराष्ट्रात उमटताना दिसेल. सरकारने त्वरित यांना कामावरती घेण्याच्या आदेश द्यावे, धर्माच्या नावाने कामावरून काढणे चुकीचे आहे.सरकारने डोळे उघडे ठेऊन कारवाई करावी. कर्जमाफीसाठी संपूर्ण महाराष्ट्रात राग आहे. कर्जमाफीसाठी ही लढाई सुरू आहे. निवडणूक जिंकण्यासाठी तुम्ही आश्वासन दिली, मग आज समाज विचारणार आहे.अनधिकृत बांधकाम ज्या ठिकाणी सुरू आहेत. ती जमीन कोणाची आहे त्याची माहिती घ्या कोणाला विकली त्याची माहिती घ्या. १७ इमारती एका रात्रीत उभ्या राहिल्या का?, असा प्रश्न उपस्थित करून मानवी दृष्टिकोनातून कायद्याने १ जून ते ३० सप्टेंबर पर्यंत पावसाळ्यात कोणतीही झोपडी पाडता येत नाही. असे मत आमदार जितेंद्र आव्हाड यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

## पोलिसांनी शहानिशा न करता माझ्यावर गुन्हा दाखल केला ; इम्तियाज जलील यांचा पत्रकार परिषदेत आरोप



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** माझ्या विरोधात अनेक पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली आहे. पोलिसांनी शहानिशा न करता माझ्यावर गुन्हा दाखल केला आहे.पोलीस नेत्यांचे गुलाम झाले आहेत. याबाबत मी हायकोर्टात जाणार आहे. पोलीस आयुक्त आणि संबंधित अधिकारी यांना न्यायालयात खेचणार आहे.असे मत इम्तियाज जलील यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

यावेळी ते म्हणाले की,फाईल समाज कल्याणमध्ये अडकलेले लोक पोलीस ठाण्यात जाऊन आंदोलन करून बोंबाबोंब करतात. फडणवीस यांनी पोलिसांना विचारावे की, संजय शिरसाट कसा दबाव आणत आहेत.माझे मुद्दे भरकटवण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. शिरसाट यांनी जिल्हाधिकारी यांच्यावर दबाव टाकून वर्ग २ ची जमीन बळकावली आहे. एवढ्या दिवसांत संजय शिरसाट यांनी एका प्रश्नाचे उत्तर दिलेले नाही.लोकांचा माझ्यावर विश्वास आहे.

मी मुद्दा सोडणार नाही. तुम्ही पोलिसांवर दबाव टाकून इम्तियाज जलील गप्प बसेल असे तुम्हाला वाटत असेल तर मी गप्प बसणार नाही.नोटीसच्या धमक्यांना मी घाबरत नाही.यापूर्वी देखील अशाच एका मंत्र्यांना नोटीस पाठवणार असल्याचे सांगितले होते. मी शिरसाट यांना ३८ तासांची मुदत देतो, तुमच्या वकीलची फी देखील मी देतो,

>> पान २

## जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील साईचरणी लीन





जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सपत्निक श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. दर्शनानंतर श्री साईबाबा संस्थानच्या वतीने उप मुख्य कार्यकारी अधिकारी भिमराज दराडे यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी मंदीर विभाग प्रमुख विष्णु थोरात, संरक्षण अधिकारी रोहिदास माळी व जनसंपर्क अधिकारी दिपक लोखंडे आदी उपस्थित होते.

## जालना अतिवृष्टी अनुदान घोटाळा प्रकरणी १0 तलाठ्यांचे निलंबन, जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली माहिती

**जालना/प्रतिनिधी :** जालना अतिवृष्टी अनुदान घोटाळा प्रकरणी जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांनी कारवाई करत १० तलाठ्यांचे प्राथमिकस्तरावर निलंबन केले आहे. त्यामुळे जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. २०२२, २३ आणि २४ वर्षांत जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झाले होते. त्याच्या भरपाई पोटी शासनाने ११० कोटी ९४ लाख ४६ हजार ९०० रुपये मंजूर करण्यात आले होते. यापैकी ११० कोटी ६० लाख २ हजार २२३ रुपये लाभार्थ्यांच्या खात्यात वर्ग करण्यात आली.

मात्र, घनसावंगी आणि अंबड तालुक्यात तहसीलदारांच्या लॉगईन पासवर्डचा गैरवापर करून कर्मचाऱ्यांनी काही लाभार्थ्यांच्या खात्यावर जास्तीची रक्कम वर्ग केली, तर काहींना दुबार अनुदान दिल्याचेही निष्पन्न झाले. या दोन तालुक्यात ३४ कोटी ९७ लाख रुपयांचा घोटाळा झाल्याचे उघड झाले असून, ८७ कर्मचाऱ्यांकडून या प्रकरणी खुलासे मागवण्यात आले. तपासाअंती पहिल्या टप्प्यात १० तलाठ्यांचे जिल्हाधिकाऱ्यांनी निलंबन केले असून, आणखीन कर्मचारी रडावर असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

## शेतकऱ्यांचे कर्ज गोठवा आणि नवीन कर्ज मिळवण्याचा मार्ग मोकळा करा

राजू शेट्टींची सरकारकडे मागणी



दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** आता आरपारची लढाई आहे. शेतकऱ्यांच कर्ज गोठवा आणि नवीन कर्ज मिळवण्याचा मार्ग मोकळा करा.अशी मागणी माजी खासदार राजू शेट्टी यांनी सरकारकडे केली आहे.

ते म्हणाले की, कर्जमुक्ती देण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी निर्णय जाहीर केलेला आहे.लाडकी बहिण योजना जाहीर करताना कोणता अभ्यास केला होता?.सिंचन घोटाळ्याच्या गाडीभर फाईल दिल्या, तेव्हा त्यातून काय निष्पन्न झालं?.अनेक घोटाळे

>> पान २

# आगामी निवडणुकीसाठी जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या प्रभाग रचना निश्चित करा: राज्य शासनाचा आदेश

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** सर्वोच्च न्यायालयानं राज्यातील चार महिन्यात स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका घ्या, असे आदेश राज्य निवडणूक आयोगाला दिले आहेत. त्यामुळं राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांच्या प्रभाग रचना निश्चित करा, असे आदेश राज्य शासनाच्या ग्राम विकास विभागानं जिल्हा परिषद आणि पंचायत समितीना दिले आहेत.

निवडणूक आयोगाचं राज्य सरकारला पत्र : ३२ जिल्हा परिषद, ३३६ पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी प्रभाग रचना करण्यासाठी लगबग सुरू झाली आहे. या दरम्यान, काही दिवसांपूर्वी राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकीसाठी प्रभाग रचना करण्याबाबत राज्य निवडणूक आयोगानं राज्य सरकारला पत्र लिहिलं होतं. यानंतर आता राज्यातील ३२ जिल्हा परिषदा आणि ३३६ पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रभाग रचना आणि सदस्य संख्या याचं प्रारुप तयार करण्यासाठी ग्राम विकास विभागानं अधिसूचना जारी केली आहे. राज्य शासनाच्या ग्राम विकास विभागानं जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांना प्रभाग रचना करण्यासाठी आदेश दिले आहेत. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती प्रभाग रचना निश्चित करण्याचे राज्य सरकारनं आदेश दिल्यानं आता राजकीय पक्षांच्या नेत्यांनी निवडणुकीची तयारी जोरात सुरू केली आहे.





### प्रभाग रचना, हरकतीची तारीख काय?

दिनांक १४/०७/२०२५ पर्यंत प्रारुप प्रभाग रचनेची अधिसूचना प्रसिद्ध करणे

दिनांक २१/०७/२०२५ पर्यंत जिल्हाधिकारी यांच्याकडे हरकती व सूचना सादर करणे

दिनांक २८/०७/२०२५ पर्यंत प्राप्त हरकतीच्या आधारे अभिप्रायासह विभागीय आयुक्त यांना प्रस्ताव सादर करणे

दिनांक ११/०८/२०२५ पर्यंत विभागीय आयुक्तांनी प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर सुनावणी देऊन निर्णय देणे

दिनांक १८/०८/२०२५ पर्यंत जिल्हाधिकारी यांनी अंतिम प्रभाग रचना मान्यतेसाठी राज्य निवडणूक आयोग किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडे सादर करणे

CMYK

## प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

मुंबई उपनगरी रेल्वे वाहतूक अर्थात मुंबईची लोकलसेवा ही मुंबईची जीवनवाहिनी समजली जाते. दररोज पाऊण कोटीहून अधिक मुंबईकर लोकल सेवेने प्रवास करतात. मात्र आज हीच मुंबईकरांची जीवनवाहिनी मुंबईकरांसाठी मृत्युवाहिनी ठरत आहे. याचा प्रत्यय पुन्हा एकदा आला. नुकतीच मुंब्रा स्थानकाजवळ लोकलमधून पडून झालेल्या दुर्घटनेत चार जणांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेनंतर मुंबईतील लोकल वाहतूक करणाऱ्या प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला. अर्थात लोकल दुर्घटनेत मुंबईकरांचा जीव जाण्याची ही पहिली वेळ नाही. या आधीही अनेकांनी अशा दुर्घटनेत आपला जीव गमवला आहे. रेल्वे अपघातात दररोज पाच ते सात जणांचा मृत्यू होतो असा एक अहवाल सांगतो याचाच अर्थ रेल्वेचा प्रवास आता पूर्वी इतका सुरक्षित राहिला नाही. या दुर्घटनेनंतर नेहमीप्रमाणे राजकीय पक्षांनी एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करून आपली राजकीय पोळी भाजून घेतली. रेल्वे मंत्रालयाने या दुर्घटनेनंतर सर्व लोकलना स्वंयचलीत दरवाजे बसवण्याचे घोषित केले तर मुख्यमंत्र्यांनी सर्व लोकल वातानुकूलित करून लोकल गाड्यांना स्वयंचलित दरवाजे बसवण्याची घोषणा केली. लोकल गाड्यांना स्वयंचलित दरवाजे बसवण्यास अनेकांनी विरोध केला. लोकलमधील वाढत्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर स्वयंचलित दरवाजे हा उपाय योग्य ठरणार नाही. स्वयंचलित दरवाज्यामुळे घुसमट होऊन लोकलमधील प्रवाशांचा जीव गुदमरणार नाही का ? असा प्रश्न उपस्थित केला जातो आणि तो योग्यही आहे. सर्वच लोकल वातानुकूलित करण्यास ही विरोध होतोय कारण लोकल वातानुकूलित केल्यावर तिकिटांचा दर वाढेल पर्यायाने सर्वसामान्य प्रवाशांच्या प्रवासावरच गदा येऊ शकते. मुंब्रा दुर्घटनेनंतर अशी दुर्घटना घडू नये यासाठी अनेक उपाययोजना सुचविल्या जात आहेत त्याचे स्वागतच व्हायला हवे मात्र मूळ प्रश्न हा मुंबईतील वाढत्या लोकसंख्येचा आहे. वाढत्या लोकसंख्येपुढे सर्वच साधनसामुग्री अपुरी पडत आहे. मुंबईत परप्रांतीयांचे लोंढेच्या लोंढे येत आहेत केवळ परप्रांतीयच नाही तर खेड्यातूनही हजारो लोक मुंबईत रोजगारासाठी स्थलांतर करत असतात त्यामुळे मुंबईची सूज वाढत चालली आहे. कितीही आणि कोणत्याही उपाययोजना केल्या तरी त्या वाढत्या लोकसंख्येपुढे अपुऱ्याच ठरणार आहे. त्यामुळेच शहरांचा नव्याने पुनर्विकास करण्याची गरज आहे मी माझ्या शहरांच्या नियोजनाचा पुनर्विचार व्हावा! या लेखातच हे लिहिले आहे. जोवर शहरांच्या नियोजनाचा पुनर्विचार होणार नाही तोवर अशा घटना घडतच राहणार आणि त्यात मुंबईकरांचा जीव जातच राहणार आहे.

# परदेशी शिक्षणाचे स्वप्न भारतातच पूर्ण होणार

## मुंबई बनणार परदेशी शिक्षणाचे हब; ५ विद्यापीठांसोबत सामंजस्य करार

**मुंबई/प्रतिनिधी :** देशातील अनेक विद्यार्थ्यांना परदेशात शक्षिणाची ओढ असते. त्यासाठी ते प्रचंड मेहनत घेत असतात. आता या विद्यार्थ्यांना भारतातच परदेशी विद्यापीठांमध्ये मिळणारे उच्च शिक्षण मिळणार आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणांतर्गत महाराष्ट्र सरकारनं पाच परदेशी विद्यापीठांसोबत सामजस्य करार केले आहेत. त्यामुळे देशातील आर्थिक राजधानी मुंबई ही आता आंतरराष्ट्रीय विद्यापीठांचं शैक्षणिक हब बनणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणा केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी यासंदर्भात पत्रकार परिषदेत माहिती दिली.

**मुंबईतील हॉटेल ताज इथं मुंबई रायझिंग**

''क्रिएटिंग अॅन इंटरनॅशनल एज्युकेशन सिटी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यात पाच आंतरराष्ट्रीय विद्यापीठांसोबत सामंजस्य करार करण्यात आला. युनिव्हर्सिटी ऑफ अॅबर्डीन (स्कॉटलंड, युके), युनिव्हर्सिटी ऑफ यॉर्क (युके), युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया (ऑस्ट्रेलिया), इलीनॉय इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (अमेरिका), इस्तितुतो यूरोपीओ दी डिझाईन (इटली) ही विद्यापीठं भारतात येणार असून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात ही विद्यापीठं उभी राहणार आहेत. या ठिकाणी आगामी काळात दहा विद्यापीठं एकत्र येतील, अशी संकल्पना आहे. सध्या या पाच विद्यापीठांमुळे हा परिसर पूर्ण शिक्षण आणि संशोधनासाठी ओळखला जाईल,'' असं मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. ''आम्ही विद्यापीठांची जागतिक रँकिंग पाहिली. त्याआधारेच विद्यापीठांना परवानगी देण्यात आली. कोणत्याही विद्यापीठांना परवानगी देणार नाही. आम्हाला फक्त दर्जेदार शिक्षण देणारी विद्यापीठं इथं हवी आहेत,'' असं देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं.




### कोणतं शिक्षण मिळणार ?

युनिव्हर्सिटी ऑफ अॅबरडीन, यूकेमधील हे सर्वात जुन्या विद्यापीठांपैकी एक आणि भारतात कॅम्पस स्थापन करणारं पहिलं स्कॉटिश विद्यापीठ आहे. या विद्यापीठाची २०० पेक्षा जास्त संशोधन केंद्र भारतातील विविध विद्यापीठांमध्ये आहेत. वेस्टर्न ऑस्ट्रेलिया विद्यापीठ हे जगातील टॉप १०० मध्ये असून ते विज्ञान, औद्योगिक आणि इंजिनिअरींग या विषयांमध्ये पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकवतील. यॉर्क विद्यापीठ ही यूकेमधील सर्वात प्रतिष्ठित संशोधन-केंद्रित संस्थांपैकी एक आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सायबर सुरक्षा, व्यवसाय, अर्थशास्त्र आणि सर्जनशील उद्योगांसह संगणक विज्ञानातील अत्याधुनिक पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम या विद्यापीठाद्वारे उपलब्ध होतील. इलिनॉय इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (इलिनॉय टेक) हे स्वतंत्ररित्या पदवी देणारं आणि भारतात कॅम्पस स्थापन करणारं पहिलं अमेरिकन विद्यापीठ आहे. संगणक विज्ञान, अभियांत्रिकी आणि व्यवसाय यासारख्या उच्च मागणी असलेल्या क्षेत्रांमध्ये पदवी आणि पदवीधर शिक्षण उपलब्ध होतील. तसेच युरोपमधील इस्टिटुटो युरोपियो डी डिझाइन हे विद्यापीठ फॅशन, उत्पादन डिझाइन आणि व्हिज्युअल कम्युनिकेशनमध्ये जागतिक दर्जाचं कौशल्य शिक्षण उपलब्ध करून देईल.

**प्रत्यक्षात सुरूवात कधीपासून ?**

''शैक्षणिक वर्ष कधीपासून सुरू करायचे, हे या विद्यापीठांना ठरवायचं आहे. ते त्याबाबत अधिसूचति करतील. या विद्यापीठांचे कॅम्पस या ठिकाणी आणत आहोत. तिथं जी स्थिती असते, तिच या ठिकाणी राहणार आहे,'' असं देवेंद्र फडणवीस यांनी विद्यापीठातील शिक्षणाच्या भाषेबाबत विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरात स्पष्ट केलं.

**परदेशी शिक्षणावरील २५ टक्के खर्च कमी होणार**

''अनेक तरुणांना जगातील विविध विद्यापीठांमध्ये शिकण्यासाठी जायचं असते. परंतु, अनेकांना ते परवडत नाही, तर अनेकांची तिथपर्यंत पोहोच नसते. या दोन्ही समस्या आता सुटल्या आहेत. हे विद्यापीठ तेच शिक्षण घेऊन भारतात येणार असून जागतिक शिक्षण मुलांना इथंच मिळणार आहे. महत्त्वाचं म्हणजे, सुमारे २५ टक्के खर्च कमी होईल,'' असं देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

**विकसित भारत करण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरण हातभार लावेल**

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान म्हणाले की, ''आगामी काळात मुंबई इथं शिक्षणाचं हब होण्यासाठी या पाच परदेशी विद्यापीठांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. नवीन शैक्षणिक धोरणामुळे जागतिक पातळीवरच्या विद्यापीठांना देखील आपल्या संस्था भारतात सुरू करता येणार आहेत. त्याचबरोबर भारतातील शिक्षण संस्थांना परदेशामध्ये आपल्या शाखा उघडता येणं शक्य होणार आहे. आज भारतातील आयआयटी, आयआयएम, आयएफ, सिम्बॉयसिस यासारख्या संस्था परदेशामध्ये सुरू झाल्या आहेत,'' अशी माहिती प्रधान यांनी दिली.

## सुनिधी चौहाननं स्वरबद्ध केलं बाप-लेक नात्याच्या अंतरंगात डोकावणारं गाणं!

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** जगभरात दरवर्षी अनेक डे पाळले जातात त्यापैकी एक म्हणजे फादर्स डे. फादर्स डे म्हणजे आपल्या आयुष्यातील पहिल्या हिरोला वंदन करण्याचा खास दिवस. आपल्यासाठी झटणाऱ्या, कायम आधार देणाऱ्या वडिलांचे आभार मानण्याची ही सुंदर संधी असते. प्रेम, कृतज्ञता आणि आठवणींनी भारलेला हा दिवस प्रत्येकासाठी हृदयात खोलवर स्थान असणारा असतो. यातही वडील आणि मुलगी यांच्यात एक्स्ट्रा खास बॉण्ड असतो, हे नातं शब्दांच्या पलीकडचं असतं. त्यातला जिव्हाळा, आधार, आणि सुरक्षिततेचा भाव सांगणं कठीणच. मात्र हेच नातं एका सुरेल गाण्याच्या माध्यमातून रसिकांपुढं उलगडणार आहे. प्रसिद्ध गायिका सुनिधी चौहान हिचा आवाज लाभलेलं हे गाणं अवकारीका या आगामी मराठी चित्रपटात ऐकायला मिळणार आहे.

गाण्याच्या ओळी

का रे बाबा का रे पप्पा...

गप्पा तुझ्या आठवतात सारख्या...

तूच सांग, कुठे गेलास रे...

माझा बाबा... माझा हक्काचा बाबा...

सुनिधी चौहान व्यक्त केल्या भावना : अशा भावनांनी भरलल्या ओळींना गीतकार अरविंद भोसले यांनी शब्दबद्ध केलं आहे, तर श्रेयस देशपांडे यांनी त्याला संगीताची भावपूर्ण साथ दिली आहे. हे गाणं केवळ एक सुरावटी अनुभव न राहता बाप-लेक नात्याच्या अंतरंगात डोकावणारं एक हळवं स्मरणरंजन ठरणार आहे. दरम्यान सुनिधी चौहान व्यक्त होत म्हणाली, ''हे गाणं गाताना मन खूप हलकं झालं. प्रत्येक मुलीच्या मनात वडिलांसाठी असणारं प्रेम आणि त्यांची आठवण यामध्ये मी स्वतःला शोधलं. 'फादर्स डे'च्या निमित्तानं प्रेक्षकांसाठी ही एक भावनिक भेट ठरेल. माझा हा बाप-लेक' नात्याला भावस्पर्शी सलाम आहे.''


अवकारीका चित्रपट कधी होणार रिलीज : अवकारीका या चित्रपटाचं दिग्दर्शन अरविंद भोसले यांनी केलं असून, निर्माते आहेत भारत टिळेकर आणि अरुण जाधव. सहनिर्मात्यांमध्ये मनोज गायकवाड, मृणाल कानडे, गीता सिंग आणि खुद्द अरविंद भोसले यांचा समावेश आहे. रेडबड मोशन पिक्चर प्रस्तुत 'अवकारीका' हा चित्रपट १ ऑगस्ट २०२५ रोजी रुपेरी पडद्यावर प्रदर्शित होणार आहे.

## संत तुकारामांच्या वंशजांची आमदार सिद्धार्थ खरात यांनी घेतली भेट: वारकरी विचारधारेस नवी दिशा!

**पुणे/प्रतिनिधी :** वारकरी चळवळीच्या प्रगल्भ वारशाला सामाजिक सुधारणा व राजकीय जाणिवांची जोड देणारी एक महत्त्वपूर्ण भेट नुकतीच पुण्यात घडली. मेहकर मतदारसंघाचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी संत तुकाराम महाराजांचे थोर वंशज आणि संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांची त्यांच्या पुणे येथील निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली.

या भेटीत महाराष्ट्र धर्माची संकल्पना, संतांचे समाज प्रबोधनातील योगदान, तसेच आजच्या सामाजिक आणि राजकीय परिस्थितीवर सखोल चर्चा झाली. संतांनी जसा महाराष्ट्र धर्म म्हणजेच अध्यात्म , दया, करूणा , समता आणि बंधुभाव मांडला, त्याचा आजच्या काळाशी संबंध लावण्याचा प्रयत्न दोघांनीही केला. त्याचबरोबर शिव , शाहू , फुले , आंबेडकरी चळवळीचा परस्परांशी असलेला पूरक संबधाची सुद्धा चर्चा केली.

डॉ. मोरे यांनी आधुनिक महाराष्ट्रात संतविचारांची त्याच बरोबर शिव शाहू फुले



आंबेडकरी चळवळीची समांतर गरज अधिक तीव्रतेने असल्याचे जाणवते, असे नमूद करत या दोन्ही मौल्यवान चळवळींचे योगदान समजावून सांगितले. या संवादातून आमदार सिद्धार्थ खरात यांनी असा विश्वास व्यक्त केला की, ''सामाजिक सलोखा आणि पारदर्शक राजकारणासाठी संतविचार व पुरोगामी स्वरूपाची शिव ,शाहू ,फुले ,आंबेडकरी चळवळ हीच खरी प्रेरणा बनू शकतात.''

ही भेट राजकीय नसून सांस्कृतिक संवादाची वीण घट्ट करणारी होती, अशी भावना आमदार खरात यांनी व्यक्त केली. सामाजिक सौहार्द आणि वारकरी तत्त्वज्ञानात वाढ करणारी ही चर्चा म्हणजे महाराष्ट्राच्या वैचारिक परंपरेतला एक उजळ क्षण ठरावा.

''तुकाराम महाराजांचे वंशज व आमदार सिद्धार्थ खरात यांच्या भेटीने महाराष्ट्र धर्मावर दिला भर!''

''राजकारणाला संतांचा स्पर्श! पुण्यात विचारांचा महासंवाद''

''संतविचारच वर्तमान समाजकारण व राजकारणाला दिशा देऊ शकते डॉ. सदानंद मोरे यांचे स्पष्ट मत त्यांनी मांडले

पान १ वरून...

### अखेर एसटीचं विभाजन

विभागाप्रमाणं सहा प्रशासकीय विभागांचा या त्रिस्तरीय रचनेत समावेश नव्हता. त्यामुळं मध्यवर्ती कार्यालयातून थेट विभागीय कार्यालयाशी संवाद साधणं भौगोलिक दृष्ट्या शक्य होत नव्हतं. स्थानिक पातळीवर वाहतुकीचं नियोजन करणं, यात्रा- जत्रा यासाठी जादा वाहतूक करणं असा निर्णय घेण्यासाठी विलंब होत होता. यासह प्रशासकीय दिरंगाईमुळं त्याचा विपरीत परिणाम एसटीच्या महसूलावर होत होता. या सर्वांची दखल घेऊन नियंत्रण नियोजन आणि समन्वयाच्या हेतूनं महामंळांतर्गत ५ प्रादेशिक विभाग करण्याचा निर्णय घेतला आहे,'' अशी माहिती मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे.

### दोन सख्या भावांचा जागेवर जीव गेला

सुरू करण्यात आले आहेत.

राज्यभरात सध्या पावसाची जोरदार हजेरी लागत असून मराठवाड्यातही पावसाचा जोर वाढला आहे. बहुतांश भागात विजांच्या कडकडाटासह पावसाने हजेरी लावली असून छत्रपती संभाजीनगरमध्ये शनिवारी बहुतांश ठिकाणी दिवसभर दमट वातावरण होते. अनेक ठिकाणी पावसाच्या मोठ्या सरी पडून गेल्या. काही भागात मुळसधार पाऊस झाला. नांदेड व हिंगोली जिल्ह्यात पावसामुळे केळी उत्पादकांचे मोठे नुकसान झाले आहे. मान्सूनची वाटचाल पाहता, पुढील काही दिवसांत कोकण, पश्र्िचम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भ विभागात पावसाचा जोर अधिक वाढण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे.

गेल्या १० ते १२ दिवसांपासून विश्रांती घेतलेला मान्सून पुन्हा सक्रिय झाला असून, राज्यातील अनेक भागांत जोरदार पावसाला सुरुवात झाली आहे. काही ठिकाणी तर ढगफुटीसदृश पावसाचे दृश्य दिसत आहे. नागरिकांनी सतर्क राहण्याचे आणि काळजी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### पोलिसांनी शहानिशा न करता

पण तुम्ही नोटीस पाठवाच. नाहीतर मीच त्यांना कोर्टात खेचून घेऊन जाणार आहे.सरकारची परीक्षा आहे, त्यांना अभ्यास करण्यासाठी वेळ दिला आहे. राज्यपाल आणि मुख्यमंत्री यांच्याकडे वेळ मागितला आहे.

त्यांनी दिला नाही तर मी तपास यंत्रणेला कागदपत्रे देणार, न्यायालयात जाणार आहे. असे मत माजी खासदार इम्तियाज जलील यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

### शेतकऱ्यांचे कर्ज गोठवा

तुमच्याकडे पाठविले मात्र, तुमचा अभ्यास कधी दिसलाच नाही. अभ्यास करून दिलेल्या कर्जमुक्तीचे काय वाटोळे झाले तेही जगाला माहिती आहे. विधानसभा निवडणुकीत सातबारा कोरा करु असे सांगितले.

त्यावेळी कोणता अभ्यास केला होता? तुम्ही किती हजार कोटींची कर्जमुक्ती देणार आहात, त्याचा आकडा जाहीर करा. तुम्ही रक्कमेचा आकडा सांगा, त्यात कसे शेतकरी बसवायचे, आम्ही सांगू, वेळकाढूपणा करणार असल्यास आम्हाला मान्य नाही, आता आरपारची लढाई आहे. शेतकऱ्यांच कर्ज गोठवा आणि नवीन कर्ज मिळवण्याचा मार्ग मोकळा करा.अशी मागणी माजी खासदार राजू शेट्टी यांनी सरकारकडे केली आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### वादग्रस्त पोस्टवरून दोन गटांमध्ये वाद, वादातून एकाचा खून

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** खंडाळा येथे दोन गटात झालेल्या भांडणात चाकू हल्ला झाला. यात एकाचा मृत्यू झाला आहे, तर दोघे गंभीर जखमी झाले होते. या घटनेने वैजापुरात तणाव निर्माण झाला होता. शुक्रवारी दिवसभर उपजिल्हा रुग्णालयात मोठा जमाव जमा होऊन जोपर्यंत उर्वरित आरोपींना अटक होत नाही तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही, अशी आक्रमक भूमिका नातेवाईकांनी घेतली होती. दरम्यान, पोलिस अधीक्षक विनयकुमार राठोड यांनी आरोपींना अटक करण्यासाठी पाच पथक रवाना केले असून लवकरच अटक केली जाईल, असे आश्वासन दिल्यानंतर नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेण्यास सहमती दर्शवली. यानंतर शुक्रवारी सायंकाळी पोलिसांच्या पथकाने उर्वरित दोन आरोपींना अटक केली आहे. याबाबत पोलिस अधीक्षक विनयकुमार राठोड यांनी शनिवारी माहिती दिली आहे.

### कर्जत एसटी महामंडळ आगाराला प्राप्त झालेल्या पाच बसेसचे आ. महेंद्र थोरवे यांच्या उपस्थितीत लोकार्पण



दैनिक आपला विदर्भ

**रायगड/प्रतिनिधी :** रायगड जिल्ह्यातील कर्जत येथील एसटी महामंडळ आगाराला नवीन सुसज्ज अशा नवीन पाच बसेस मिळाल्याने कर्जत आगार येथे कर्जत खालापूर मतदारसंघाचे आमदार महेंद्र थोरवे यांच्या उपस्थितीत नवीन बसेस चे लोकार्पण करण्यात आले. कर्जत तालुक्यातील विविध ठिकाणी दुर्गम भागात एसटी बसेस पोहचल्या असून, याचा अनेक सर्व सामान्य जनतेला फायदा होत आहे. कर्जत आगाराला नवीन बसेस मिळाल्याने नागरिकांचा प्रवास अत्यंत सुलभ आणि आरामदायी होणार आहे.


### गोवंडीत डंपर चालकाने तीन जणांना चिरडले, संतप्त जमावाकडून ठिय्या




दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई येथील गोवंडी शिवाजी नगर भागात एका डंपर चालकाने तीन जणांना चिरडल्याची घटना काही वेळापूर्वी घडली आहे. यात तिन्ही प्रवशांचा मृत्यू झाला आहे. घाटकोपर मानखुर्द लिंक रोड वर हा अपघात झाला आहे. यामुळे संतप्त जमावाने या मार्गावर ठिय्या दिला आहे. यामुळे या मार्गावर दोन्ही दिशेने मोठी वाहतूक कोंडी ही झाली आहे. या अपघातातील आरोपी डंपर चालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले असून, घटनास्थळी मोठ्या प्रमाणात पोलीस दाखल आहेत.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जो कामाचा लेखाजोखा मांडला ते बघून इतर लोक पक्षात येऊ इच्छितात - सावे





दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज जो जनते समोर कामाचा लेखाजोखा मांडला ते बघून इतर पक्षातील नेत्यांना असं वाटतंय हे दोन्ही नेते देशाच्या विकासासाठी काम करतायत. म्हणून इतर पक्षातील नेत्यांना वाटतं आहे की, त्यांच्यासोबत गेलं पाहिजे.

# विमान अपघातात काय तांत्रिक बिघाड झाला त्याची कारणे समोर आली पाहिजे : आमदार सतेज पाटील

## माध्यमांशी बोलताना विविध विषयांवर भाष्य

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** विमान अपघातील ब्लॅक बोकक्स ताब्यात घेतला आहेत. आत्ता ही सर्व माहिती पब्लिक डोमेन मध्ये आणायला हवी. नेमकं काय तांत्रिक बिघाड झाला हे समोर आले पाहिजे. जी कारणे असतील ती समोर आणली पाहिजे, असे मत काँग्रेस आमदार सतेज पाटील यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

यावेळी ते म्हणाले की, जागतिक पातळीवर आपण सेफ आहोत. हे भारताने दाखवून द्यायला, हवे त्यामुळे सरकारने सगळ्या प्रकरणाकडे गंभीर्याने पहावे, पाहणी आणि फोटोसेशन मधून काय मिळणार आहे हे माहिती नाही.बच्चू कडू यांच्या अन्यथा आंदोलनाबाबत बोलताना ते म्हणाले की, देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभा निवडणुकीत कर्जमाफी करतो असा आश्वासन दिले होते, पण अजित पवार म्हणतात मी हे आश्वासन दिले नाही. बच्चू कडू यांच्या आंदोलनानंतर समिती नेमतो असा आश्वासन देण्यात आले. पण समितीला कार्यकाल दिला आहे. का हे माहिती नाही पण सरकारने त्याबाबत कार्यकाल द्यायला हवे. जिल्हा परिषद आणि राज्यातील निवडणूक आहेत म्हणून सरकार ही समिती गठीत करत आहे का?? असा प्रश्न पडलाय.



पूर्वी प्रभाग रचना अधिकार निवडणूक आयोगाला होता. पण आत्ता प्रभाग रचना अधिकार बदलला आहेत. नगर रचना विभाग असो वा इतर विभाग त्यांनी प्रभाग रचनेमध्ये हस्तक्षेप करू नये.जर हस्तक्षेप केला तर प्रभाग रचनेवर आमचे बारीक लक्ष आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांनी दबावांमध्ये काम करून प्रभाग रचना करू नये. १०२ ॲम्बुलन्सचे टेंडर कोणाला द्यायचे ते द्या. पण गरिबाला सेवा द्या. आम्ही योजना आणली. पण ती सर्व मोडकळीस आणून नवे काही तरी करायचा प्रयत्न आहे. आत्ताच ही सेवा अडचणीत का येत आहे याचा विचार करायला हवा. स्व. शिवसेना पक्षप्रमुख बाळासाहेब ठाकरे याच्या मुशीत उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे तयार झाले. त्यामुळे कोणाच्याही घरात वाद नकोत ही आमची भूमिका. ते दोघे येत असतील तर आमच्या त्यांना शुभेच्छा आहेत. सरकारने हिंमत असेल तर अँटी कॅरप्शनच्या कारवाया वाढवाव्यात. आधी कारवाई झालेली नाही. त्यामुळे अनेकांची हिम्मत वाढली आहे.

राष्ट्रवादीचे एकत्रीकरण होणार नाही.मी त्याच्याशी चर्चा केलेली नाही. पूर्वी सारख्या शांतता कमिटीच्या बैठका घेतल्या जात होत्या. पण आता त्या बैठका होत नाहीत. त्यामुळे सरकारने आर आर आबा असताना ज्या पद्धतीने शांतता कमिटीच्या बैठका होत्या तशा बैठका घ्याव्यात. गृह विभागाचा आवाका पाहिल्यास खूप मोठा आहे. त्यामुळे गृह विभागाला स्वातंत्र्य पणे व्यक्ती असणं राज्याच्या हिताचे.आहे असे मत काँग्रेसचे आमदार सतेज पाटील यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

### माजी नगरसेविकाच्या मुलीला शिवीगाळ, अंबरनाथमध्ये
## गावगुंडांनी पाडला रक्ताचा सडा, तरुण रक्तबंबाळ

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** ठाणे जिल्ह्याच्या अंबरनाथमधील बारकूपाडा परिसरात दोन गटात जोरदार राडा झाल्याची घटना समोर आली आहे. इथं माजी नगरसेविकाच्या काही गावगुडांनी हातात नंग्या तलवारी घेऊन भररस्त्यात धुडगूस घातला आहे. आरोपींनी तलवारीने वार करत एका तरुणाला रक्तबंबाळ केलं. यावेळी संबंधित तरुणाच्या काही नातेवाईकांनी हल्लेखोर गुंडांवर प्रतिहल्ला केला. दोन गटातील राड्यामुळे परिसरात मोठं तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं. माजी नगरसेविकाच्या मुलीला शिवीगाळ केल्यामुळे हा राडा झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अंबरनाथच्या बारकूपाडा परिसरात ही घटना घडली. याच परिसरात राहणारी माजी नगरसेविकेची मुलगी काल (शुक्रवारी,ता१३) सायंकाळी घरी येत होती. यावेळी रस्त्यात एक तरुण गाडीच्या आडवा आला. त्यामुळे नगरसेविकेच्या मुलीने या तरुणाला बाजूला हटण्यासाठी तीन वेळा गाडीचा हॉर्न वाजवला. मात्र हा तरुण बाजुला झाला नाही. यामुळे नगरसेविकेची मुलगी संबंधित तरुणावर संतापली. यावेळी झालेल्या शाब्दिक वादात संबंधित तरुणाने नगरसेविकेच्या मुलीला शिवीगाळ केल्याचा आरोप आहे.

या प्रकारानंतर नगरसेविकेच्या समर्थक असलेल्या दोन तरुणांनी शिवीगाळ करणाऱ्या तरुणावर धारदार शस्त्राने वार केले. मात्र हे तरुण वार करून तिथून पळून जात असतानाच परिसरातील लोकांनी त्यांना घेराव घालत चोप दिला. तसेच त्यांचा पाठलाग करत थेट नगरसेविकेच्या घरावर दगडफेक केली. या सगळ्या प्रकरणानंतर नगरसेविकेच्या गुंडांनी हल्ला केलेल्या तरुणाला रक्तबंबाळ अवस्थेत उल्हासनगरच्या शासकीय मध्यवर्ती रुग्णालयात दाखल करण्यात आले. याठिकाणी त्याच्यावर उपचार सुरू आहेत. दोन गटा झालेल्या राड्याम ुळे शिवाजीनगर पोलिसांनी बारकू पाडा परिसरात धाव घेत मोठा पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे.

दरम्यान, अंबरनाथ परिसरातील आदिवासी महिलांनी आज मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्याकडे दाद मागितली. पारधी समाजाच्या या कुटुंबाच्या हक्काच्या जागेवरून त्यांना हुसकावून लावण्याचा प्रयत्न केला जातोय, असा आरोप या महिलांनी केला. त्यासाठी स्थानिक नगरसेविकाचे गुंड दिवसा ढवळ्या तलवारी नाचवत फिरत आहेत, गुंडाच्या हल्ल्यात त्यांच्यातील एक तरूण गंभीर जखमी झाला असून तो मरणाच्या दारात पोहचला आहे. न्यायाची मागणी करण्यासाठी हे लोक मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्याकडे आले होते.

## आम्ही पक्षाशी गद्दारी केली नाही : शंभूराज देसाई

दैनिक आपला विदर्भ

**सातारा/प्रतिनिधी :** विरोधकांनीच चार चार पक्ष बदलून आज भाजपमध्ये प्रवेश केला आहे.त्यांनी किती पक्षाशी गद्दारी केली आहे हे आत्मचिंतन करावे, आपण १९९७ सालापासून पक्षाशी एकनिष्ठ असून आजवर शिवसेना पक्षाशी एकनिष्ठ राहून पक्षाची ताकद वाढवली आहे.तर, आरोप करणाऱ्यांनी पक्षाशी किती गद्दारी केली आहे हे आत्मचिंतन करावे, असा टोला सत्यजित पाटणकर यांच्यावर मारला. साताराच्या राजकारणात मोठी उलथापालत होऊन अनेक दिग्गज नेते भाजपमध्ये प्रवेश करताना दिसत आहेत. यामध्येच शंभूराज देसाई यांचे प्रतिस्पर्धी आणि पाटण तालुक्याचे नेते सत्यजितसिंह पाटणकर यांनी भाजपमध्ये प्रवेश करून आपली नवीन राजकीय कारकीर्द सुरू केली आहे. मात्र सत्यजित पाटणकर यांनी भाजपमध्ये प्रवेश करताना शंभूराज देसाई यांच्यावर अनेक आरोप केले आहेत. शंभूराज देसाई यांनी अनेकवेळा पक्षाशी गद्दारी केली आहे असा आरोप करत त्यांच्यावर टीका केली आहे. त्यालाच उत्तर देताना शंभूराज देसाई यांनी त्याबद्दलचा खुलासा केला आहे की, आपण १९९७ सालापासून पक्षाशी एकनिष्ठ असून आजवर शिवसेना या पक्षाशी एकनिष्ठ राहून पक्षाची ताकद वाढवली आहे.आम्ही कधीही पक्ष बदललेला नाही. याउलट आमच्या विरोधकांनीच चार चार पक्ष बदलून आज भाजपमध्ये प्रवेश केला आहे. त्यांनी किती पक्षाशी गद्दारी केली आहे हे आत्मचिंतन करावे असा प्रति टोला मारून सत्यजित पाटणकर यांच्या विरोधात आपण राज्याचे मुख्यमंत्री आणि भाजपचे नेते देवेंद्र फडणवीस यांना भेटायला जाणार आहोत अशी माहिती देखील पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, यांनी माध्यमांशी बोलताना दिली आहे.



## देश संकटात असल तरी विरोधक आपल्या अकलेची तारे तोडतात

दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** अहमदाबाद विमान अपघात अतिशय दुर्दैवी घटना. सर्वांनी या घटनेवर संवेदना व्यक्त केल्या. मात्र, विरोधक यावर खालच्या भाषेत टीका करता आहेत. विरोधकांना गांभीर्य कधी कळेल? युद्ध झालं तरी विरोधकांकडून टीका केली जाते, विमान अपघात ही एवढी मोठी दुर्दैवी घटना घडली तरीही विरोधक टीका करतात.अशी टीका माध्यमांशी बोलताना मंत्री गिरीश महाजन यांनी विरोधकांवर केली.

यावेळी ते म्हणाले की, देश संकटात असतानाही विरोधक आपल्या अकलेची तारे तोडतात. विरोधकांकडून केवळ आपली राजकीय पोळी भाजण्याचे काम केले जाते.भाजप शिवसेना युती नैसर्गिक अजित पवारांसोबत झालेली युतीबाबत उदय सामंत यांच्या राजकीय वक्तव्यावर बोलताना म्हणाले की, शिवसेनेची व भाजपची युती ३५ वर्षांपासून आहे ही वस्तुस्थिती आहे. अजित पवार यांच्याशी युती आता झालेली आहे.खरी शिवसेना एकनाथ शिंदे यांची हे न्यायालयाने सुद्धा सांगितले. त्यामुळे त्यांच्या आणि आमच्या विचारांमध्ये साम्यता आहे. शिवसेना व भाजपामध्ये एक वाक्यता व एक आयडॉलॉजी म्हणून उदय सामंत जे म्हणाले ते योग्य आहे.असे मतही यावेळी मंत्री गिरीश महाजन यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

**गिरीश महाजन यांची विरोधकांवर टीका**



## अक्कलकोट तालुक्याला पाणीपुरवठा करणारे कुरनूर धरण ९७ टक्के भरले

दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी :** अक्कलकोट तालुक्याला पाणीपुरवठा करणारे कुरनूर धरण ९७ टक्के भरले आहे. त्यामुळे अक्कलकोट तालुक्यातील पाणीटंचाई भेटली असल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. कुरनूर धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू असून, नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

तुळजापूर तालुक्यातील बोरी, हरणा नदी क्षेत्रात गेल्या दोन दिवसांत झालेल्या मुसळधार पावसामुळे कुरनूर धरणाची पाणीपातळी वाढली आहे. जून महिन्याच्या सुरुवातीलाच धरण ९७ टक्के इतके भरले आहे. त्यामुळे धरणाचे तीन दरवाजे उघडून ४५० क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. या धरणावर अक्कलकोट, दुधनी, मैंदर्गी यांच्यासह ५१ गावांचा पाणीपुरवठा अवलंबून आहे. पुढील पावसाचा जोर लक्षात घेता धरणातून पाण्याचा विसर्ग आणखी वाढण्याची शक्यता आहे. नागरिकांनी नदीपात्राजवळ जाणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी खंडाळा येथे शेतात केली सोयाबीन पेरणी

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी** :बीड जिल्हाधिकारी श्री. विवेक जॉन्सन यांनी शेतकऱ्यांच्या मनोबल वाढवण्यासाठी खंडाळा (ता. बीड) येथील शेतकरी बाबासाहेब चिंतामण जायभाये यांच्या शेतात उतरून चाडयावर मुठ धरत सोयाबीन पेरणी केली. पावसाळा सुरू होताच शेतकरी पेरणीच्या कामात व्यस्त असून, त्यांच्या या मेहनतीला प्रशासनाचा पाठिंबा असल्याचे प्रत्यक्ष कृतीतून दाखवत जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः शेतमळ्यात उतरून सोयाबीनच्या बियाणांची ची मुठ धरून पेरणी केली. यावेळी तहसीलदार श्री. चंद्रकांत शेळके, जिल्हा कृषी अधीक्षक श्री. सुभाष साळवे , मंडळ अधिकारी, कृषी सहाय्यक, ग्रामस्थ आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हाधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून शेतीसंदर्भातील अडचणी जाणून घेतल्या आणि शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली. कृषी विभागाच्या वतीने योग्य बियाणे, खतांचा पुरवठा व सल्ला वेळेत मिळावा, यासाठीही सूचना देण्यात आल्या. यानंतर खंडाळा गावाची पाहणी केली व नंतर महावितरणचे विद्युत पोलची व गावातील विद्युत तारा याची देखील पाहणी केली.





# सतेज पाटलांनी न बोलता मी विजयी होणार असं सांगितलं पाहिजे : मुश्रीफ

दैनिक आपला विदर्भ



**कोल्हापूर/प्रतिनिधी :** सतेज पाटलांकडून ही अपेक्षा नाही. त्यांनी लढलं पाहिजे आणि मी विजय होणार असं सांगितलं पाहिजे, गोकुळचे मतदार ठराविक आहेत. ते फार हुशार आहेत. गोकुळ आणि विधान परिषदेला मी एकटा पडलोय असं म्हटल्यावर काही उपयोग होणार नाही. महाविकास आघाडी, महायुती आहे सर्वजण आपापले पक्ष घेऊन लढणार आहोत.असे मत मंत्री हसन मुश्रीफ यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

यावेळी ते म्हणाले की, जिल्हा नियोजन समितीची बैठक होणार आहे. त्यासोबतच अनेक समित्या नेमायच्या आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत. या सर्वा संदर्भात ही बैठक घेण्यात येत आहे. प्रत्येक मंत्रिमंडळाच्या बैठकीत कोरोना संदर्भात आढावा असतो. आताचा नवीन व्हेरियंट जो आहे. जास्त गंभीर नाही. लोक ऍडमिट होत आहेत आणि बरे होऊन जात आहेत. केवळ वयस्कर लोकांना केवळ थोडी काळजी घेण्याची आवश्यकता आहे. कोरोनाचे वेगळे वॉर्ड करण्यासाठी सगळ्या रुग्णालय प्रशासनाला आदेश देण्यात आले आहेत. या संदर्भात अद्याप माहिती घेतलेली नाही.

मात्र, सार्वजनिक आरोग्य विभागाचा विषय आहे ते योग्य ते कारवाई करतील. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र, ठाकरे बंधू एकत्र यावेत, पवार एकत्र यावेत ही सर्वांची इच्छा आहे, मात्र याचा मुहूर्त कधी आहे हे फक्त नेतेमंडळींना माहिती आहे. यासंदर्भात आम्हाला कोणतेही माहिती मिळालेले नाही योग्य वेळ आल की कळेल. एकत्र येण्याचा निर्णय वरिष्ठ नेतेमंडळी येतील.ऑपरेशन टायगर वगैरे असं काही नसते. कार्यकर्त्यांना समजावून या निवडणुकीत आम्ही तुमच्या मागे कसे उभारणार आहे. हे सांगून त्याचं मत आणि मन परिवर्तन करून मग पक्षाचा गणित बसत असते.

सतेज पाटील

– मी एकटा पडलेलो आहे हे सतेज पाटलांच मी वाचले. हे सर्व जनरल निवडणुकीमध्ये ठीक आहे, असं बोलून त्यांना सहानुभूती मिळू शकेल. मात्र गोकुळ, विधान परिषदेच्या निवडणुकीत एकटे पडलोय म्हटले की घोटाळा होतोय.बहुतेक याचा पराभव होतोय म्हणून लोक जात नाहीत. सतेज पाटलांकडून ही अपेक्षा नाही. त्यांनी लढलं पाहिजे आणि मी विजय होणार असं सांगितलं पाहिजे, गोकुळचे मतदार ठराविक आहेत ते फार हुशार आहेत. गोकुळ आणि विधान परिषदेला मी एकटा पडलोय असं म्हटल्यावर काही उपयोग होणार नाही. महाविकास आघाडी, महायुती आहे सर्वजण आपापले पक्ष घेऊन लढणार आहोत.असे मत मंत्री हसन मुश्रीफ यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

## नागपूरमधील जय कमल कॉम्प्लेक्सला भीषण आग, २ जणांचा मृत्यू तर १ जण गंभीर जखमी

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** नागपूरच्या महाल परिसरातील जय कमल कॉम्प्लेक्समध्ये आग लागल्याची घटना घडली आहे. संध्याकाळी साडेसात ते ८ वाजण्याच्या दरम्यान इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील सदनिकेत ही आग लागल्याची माहिती मिळत आहे. या आगीत २ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळाली आहे. तर एकजण गंभीर जखमी झाला आहे. प्रचंड धुरामुळे दोघांचा मृत्यू झाला असावा असा प्राथमिक अंदाज आहे.

या इमारतीत एका सदनिकेत इव्हेंटमध्ये वापरल्या जाणाऱ्या आतिषबाजीशी संबंधित काही ज्वलनशील पदार्थ साठवलेले होते. त्यातून आग लागल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. हा संपूर्ण भाग अत्यंत व्यवस्त आणि वर्दळ असलेल्या बाजारपेठेचा परिसर असल्यामुळे आग लागली तेव्हा प्रचंड धावपळ उडाली होती.

आगीची माहिती मिळताच नागरिकांनी लगेच अग्निशामक दलाला बोलावले. अग्निशमाक दलाच्या दोन गाड्यांनी आगीवर बऱ्यापैकी नियंत्रण मिळवले असून सध्या पाण्याचे फवारे मारून कुलिंग करण्याचे काम केले जात आहे. या आगीत तीन जण गंभीर जखमी झाल्याची माहिती मिळाली आहे. आतापर्यंत अग्निशामक दलाच्या पाच गाड्यांना बोलावण्यात आले असून त्यांच्या मदतीने आगीवर आता पूर्णपणे नियंत्रण मिळाले आहे. सध्या आग पुन्हा भडकू नये म्हणून कुलिंग करण्याचे काम अग्निशमन दलाकडून केले जात आहे.

## बच्चू कडू यांच्या आंदोलनाला कॉंग्रेसचा पाठिंबा, खासदार प्रतिभा धानोरकर यांनी लिहिले पत्र

दैनिक आपला विदर्भ



**चंद्रपूर/प्रतिनिधी :**प्रहार जनशक्ती संघटनेचे प्रमुख बच्चू कडू हे गेल्या ७ दिवसांपासून अम रावतीत उपोषणाला बसले आहेत. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसह विविध मागण्यांसाठी हे अन्नत्याग आंदोलन सुरु आहे. बच्चू कडू यांच्या आंदोलनाला कॉंग्रेसच्या खासदार प्रतिभा धानोरकर यांनी पाठिंबा दिला आहे.

वास्तविक, दिव्यांगांना ६ हजार मानधन, शेतकऱ्यांना कर्जमाफी अशा विविध मागण्या घेऊन माजी मंत्री आणि प्रहार जनशक्ती संघटनेचे प्रमुख बच्चू कडू यांनी उपोषण छेडले आहे. या आंदोलनाला आता विरोधी पक्ष आणि इतर संघटनाचा मोठा पाठिंबा मिळत आहे. आता कॉंग्रेसच्या खासदार प्रतिभा धानोरकर यांनीही बच्चू कडू यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. प्रतिभा धानोरकर या चंद्रपूरच्या खासदार आहेत.

प्रतिभा धानोरकरांचं बच्चू कडूंना पत्र– प्रतिभा धानोरकर यांनी पत्र लिहू बच्चू कडू यांना आपला पाठिंबा व्यक्त केला आहे. माजी आमदार बच्चू कडू हे शेतकरी, दिव्यांग आणि समाजातील वंचित घटकांच्या न्याय हक्कांसाठी सातत्याने संघर्ष करत असल्याचं खासदार प्रतिभाताई धानोरकर यांनी आपल्या पत्रात नमूद केलं आहे. ''आपण जनसामान्यांच्या हितासाठी नेहमीच संघर्ष करत आला आहात, आपल्या नेतृत्वाखालील प्रहार जनशक्ती पक्ष सातत्याने विविध प्रश्नांवर आवाज उठवत आहे, ही बाब अभिनंदनीय आहे,'' असं खासदार धानोरकर यांनी आपल्या पत्रात लिहिलं आहे.

बच्चू कडू यांनी पुकारलेल्या आंदोलनाच्या मागण्या जनसाम ान्यांच्या हिताच्या असून, त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण करत असलेल्या प्रयत्नांना आपला आणि आपल्या पक्षाचा पूर्ण पाठिंबा असल्याचे खासदार प्रतिभाताई धानोरकर यांनी स्पष्ट केले आहे. ''जनप्रतिनिधी म्हणून जनतेचे प्रश्न शासनासमोर मांडणे आणि ते सोडवण्यासाठी पाठपुरावा करणे, हे आपले कर्तव्य आहे. आपण करत असलेले हे आंदोलन निश्चितच सकारात्मक परिणाम घडवेल, अशी मला आशा आहे,'' असेही धानोरकरांनी पत्रात नमूद केले आहे.

## कर्जमाफी साठी पंधरा दिवसात उच्चस्तरीय समिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे बच्चू कडू यांना पत्र

दैनिक आपला विदर्भ



**अमरावती/प्रतिनिधी :** गेल्या सात दिवसांपासून माजी मंत्री ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करावी, दिव्यांगांना अनुदानात वाढ करावी यास १७ मागण्यांसाठी अन्नत्याग आंदोलन सुरू केले होते.जोपर्यंत शेतकऱ्यांना कर्जमाफी होत नाही व मागण्या निकाली निघत नाहीत. तोपर्यंत आंदोलनवर ठाम असल्याचा इशारा माजी मंत्री कडू यांनी दिला होता.त्यानंतर संपूर्ण राज्यासह तब्बल दिल्ली व पंजाब मधूनही माजी मंत्री बच्चू कडू यांच्या आंदोलनाला वाढता पाठिंबा लक्षात घेता राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बच्चू कडू यांना पत्र देत कर्जमाफीबाबत पंधरा दिवसात उच्चस्तरीय समिती गठित करण्यात येईल व निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन दिले आहे. त्यानंतर उदय सामंत यांच्या मध्यस्थीने माजी मंत्री बच्चू कडू यांचे उपोषण स्थगित करण्यात आले आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आमदार बच्चू कडू यांना शेतकरी कर्ज माफीसाठी १५ दिवसामधे उच्चस्तरीय समिती नेमली जाईल, समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर कर्ज माफी संदर्भात निर्णय घेण्यात येईल तथा थकीत कर्जदाराच्या सक्तीच्या वसुलीला स्थगिती देणे व नवीन कर्ज वाटप करण्यासाठी बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल. दिव्यांगाच्या मानधन वाढी बाबत ३० जून च्या पुरवणी बजेटमध्ये तरतूद करण्यात येईल.उर्वरित मुद्यावर संबंधित मंत्री तथा मुख्यमंत्र्यां सोबत बैठक घेऊन मागण्या निकाली काढल्या जातील. असे आश्वासन महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. त्यानंतर बच्चू कडू यांचे उपोषण सातव्या दिवशी स्थगित करण्यात आले असून उदय सामंत यांच्या उपस्थितीत उपोषण सोडले आहे.तर, बच्चू कडू यांनी कर्जमाफीसाठी २ ऑक्टोबरपर्यंत सरकारला अल्टिमेटम दिला आहे. सरकारने आश्वासन पाळले नाही तर मंत्रालयावर येणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

## शरद पवार गटात पुन्हा भूकंप?

**मुंबई/प्रतिनिधी :** मागील काही दिवसांपासून राष्ट्रवादीचा शरद पवार गट आणि अजित पवार गट एकत्र येणार असल्याच्या चर्चा सुरू आहेत. दोन्ही बाजुच्या नेत्यांकडून यावर सकारात्मक प्रतिक्रिया दिल्या जात आहेत. काही दिवसांपूर्वी शरद पवार यांनी स्वत: अजित पवार गटासोबत जाण्याबाबत सूचक वक्तव्य केलं होतं. आमच्या पक्षातील काही लोक अजित पवार गटासोबत जाण्यास इच्छुक, पण पक्षाचे निर्णय घेण्याचा अधिकार सुप्रिया सुळेंना आहे, अशा आशयाचं वक्तव्य शरद पवारांनी केलं.

# कुलरचा शॉक लागून आईसह दोन चिमुकल्यांचा मृत्यू

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** अमरावती जिल्ह्यात एक धक्कादायक घटना घडली आहे. कुलरचा शॉक लागून आईसह दोन चिमुकल्यांचा मृत्यू झाला आहे. अचलपूर तालुक्यातील चमक बुद्रुक येथे आज सायंकाळी ७ वाजताच्या दरम्यान ही घटना घडली आहे. कुलरमध्ये पाणी टाकताना विद्युत शॉक लागून आईसह दोन चिमुकल्यांचा मृत्यू झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पती कामावरून आल्यानंतर या घटनेचा खुलासा झाला. तोपर्यंत याबाबत कोणालाच काही माहिती नव्हते. या घटनेनंतर सरमसपुरा पोलीस घटनास्थळी रवाना झाले आहेत. सुमती लक्ष्मण कासदेकर (वय ३५) श्वेता लक्ष्मण कासदेकर (वय ४) आणि विकी लक्ष्मण कासदेकर (वय ३) अशी मृतांची नावे आहेत. दुसऱ्या खोलीत असलेली चार मुलं ही बचावली आहेत. लक्ष्मण कासदेकर यांना एकूण सहा अपत्य होती. दरम्यान, एकाचवेळी आईचा आपल्या दोन चिमकल्यांसह मृत्यू झाल्यानं परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. कुलरमध्ये पाणी टाकताना ही घटना घडली आहे. दरम्यान, या घटनेचा अधिकचा तपास पोलिस करत आहेत.

जालना जिल्ह्यातून हृदयद्रावक घटना समोर आली असून विजेचा धक्का लागल्याने बाप आणि दोन चिमुरड्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. या घटनेत विनोद मस्के आणि त्यांचा मुलगा समर्थ आणि मुलगी श्रद्धा मस्के यांचा मृत्यू झाला. दरम्यान, घटनेची माहिती कळताच गावकऱ्यांना तिघांनाही तात्काळ जालना शहरातील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केलं होतं. मात्र, डॉक्टरांनी उपचारापूर्वीच त्यांना मृत घोषित केलं. या दुर्दैवी घटनेमुळे वरुड गावासह संपूर्ण परिसरात शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. शेतकाम करत असताना विद्युत तारेचा स्पर्श होऊन पित्यासह दोन लहान मुलांचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे.

बीडच्या गेवराई तालुक्यातील मारफळा येथून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. यात उसाच्या शेतामध्ये खत देण्याचे काम करत असलेल्या बाप लेकाला विद्युत तारेचा शॉक लागल्याची घटना घडली आहे. या विद्युत तारेच्या जबर धक्क्यामध्ये पिता पुत्राचा मृत्यू झालाय. अभिमान कबले आणि ज्ञानेश्वर कबले असे



या दोघा बापलेकाचे नाव आहे. हे दोघेजण आपल्या शेतात काम करत असताना त्या ठिकाणी विद्युत तार खाली पडलेली होती. यात प्रवाह असल्याने दोघांनाही त्याचा शॉक लागला. ही घटना घडल्यानंतर त्या दोघांना तात्काळ बीडच्या जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## विविध वृत्त...

### जिल्ह्यात नैसर्गिक आपत्ती, पूरपरिस्थिती निर्माण झाल्यास प्रशासन सज्ज



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** पावसाळ्याला सुरुवात झाला आहे आणि त्या अनुषंगाने बुलढाणा जिल्ह्यात नैसर्गिक आपत्ती किंवा पूर परिस्थिती निर्माण झाल्यास त्यावर मात करण्यासाठी प्रशासन सज्ज आहे. जिल्हा आपत्ती विभागाला शासनाकडून लाईफ जॅकेट, बोटी यासह १६ प्रकारचे साहित्य प्राप्त झाले आहे. या साहित्याचे तालुका स्तरावर वितरण करण्यात आले आहे. त्याचबरोबर धरण परिसरात कर्मचाऱ्यांचं प्रशिक्षण देखील पार पडले आहे, शिवाय आपत्ती आल्यास पुरेसे अनुभवी मनुष्यबळ असावं यासाठी पुणे येथे एनडीआरएफ मार्फत प्रशिक्षणासाठी कर्मचारी पाठवण्यात आले आहेत.

### गहाळ झालेले २२ मोबाईल मूळ मालकांना केले परत; बुलढाणा शहर पोलिसांची कामगिरी

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा शहर पोलिस स्टेशन हद्दीतून चोरी झालेल्या मोबाईल चोरीच्या गुन्ह्यांचा यशस्वीरित्या उलगडा करीत तब्बल २२ मोबाईल जप्त करण्यात आले असून बुलढाणा शहर पोलीस स्टेशन येथे सर्व मोबाईल मुळ मालकांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. विशेष बाब म्हणजे, जळगाव, अकोला, जालना यासारख्या परजिल्ह्यात या मोबाईलचा शोध लागला आहे. अनोळखी तरुणांकडून काही लोकांनी हे मोबाईल विकत घेतले असल्याची माहिती आहे. मोबाईल चोरीच्या विविध गुन्ह्याच्या संदर्भाने शहर पोलिसांचे विशेष पथक नेमण्यात आले. या पथकाने तांत्रिक विश्लेषण व गुप्त माहितीच्या आधारे मोबाईलचा शोध लावला. तब्बल ३ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे.

### स्मशानभूमीतील अतिक्रमण हटवण्यासाठी महिलांचे अन्नत्याग आंदोलन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्याच्या मेहकर तालुक्यातील वेणी गावामध्ये दलीत समाजाच्या स्मशानभूमीसाठी गेल्या वीस वर्षांपासून अडीच एकर जमीन समाजाच्या ताब्यात आहे. ज्याची नोंद ग्रामपंचायतला असल्याचे सांगण्यात येत आहे. समाजाने या जागेवर झेंडा लावून कुंपण केले आहे. मात्र सरपंच, सचिव यांनी याचं जागेतील एक गुंठा जमीन गावातील व्यक्तीच्या नावावर केल्याचा आरोप महिलांनी केला आहे. हे अतिक्रमण काढण्यात यावं, जमिनीवर केलेले कुंपण आणि झेंडा कायम ठेवावा या मागणीसाठी २३ महिलांनी बुलढाण्यात अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. जोपर्यंत मागण्या मंजूर होत नाही तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याचा पवित्रा महिलांनी घेतला आहे.

### रत्नागिरी नगरपरिषदेतील अधिकाऱ्यांच्या गैरकारभाराचा निषेध करण्यासाठी मनेसेचा मोर्चा

दैनिक आपला विदर्भ

**रत्नागिरी/प्रतिनिधी :** रत्नागिरी नगरपरिषदेतील अधिकाऱ्यांच्या गैरकारभाराचा निषेध करण्यासाठी आणि विविध जनहितार्थ प्रश्नांसंदर्भात मनसेकडून रत्नागिरी नगरपरिषदेवर मोर्चा काढण्यात आला. ''अधिकाऱ्यांच्या गैरकारभाराची वरात नगरपरिषदेच्या दारात'' अशा घोषणांनी यावेळी परिसर दुमदुमून गेला होता. जयस्तंभ ते पालिका असा हा मोर्चा काढण्यात आला. मनसेचे महिला पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संखेने सहभागी झाले होते. त्यांच्या हातात विविध मागण्यांचे फलक होते. जिल्हाधिकारी कार्यालयात बैठकीसाठी गेलेले मुख्याधिकारी जोपर्यंत इथे येत नाहीत तोपर्यंत इथून हटणार नाही अशी भूमिका घेत सर्व मोर्चेकरांनी नगरपरिषद आवारमध्ये घेराव घालून घोषणाबाजी सुरु ठेवली. शेवटी मुख्याधिकारी स्वतः आले, त्यांना जिल्हाध्यक्ष अविनाश सौन्दळकर, अरविंद मालाडकर यांनी मागण्या काय आहेत याची माहिती दिली. आगामी पंधरा दिवसांत कारवाई न झाल्यास याही पेक्षा मोठं आंदोलन करू, असं यावेळी मनसेकडून सांगण्यात आले आहे.